प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. १४ सप्टेंबर २०२०**

**सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदी श्री. एस.एस. पाटील व श्री. कैलास शिंदे; मुख्य दक्षता अधिकारी पदी श्री. एस. एच. महावरकर**

भारतीय प्रशासकीय सेवेतील **श्री. एस. एस. पाटील** व **श्री. कैलास शिंदे** यांनी सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. तर **श्री. एस. एच. महावरकर** यांनी सिडकोच्या मुख्य दक्षता अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला आहे.

श्री. एस. एस. पाटील सन २०११ च्या तुकडीतील व श्री. कैलास शिंदे सन २०१३ च्या तुकडीतील भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस) अधिकारी आहेत तर श्री. एस. एच. महावरकर हे सन २००५ च्या तुकडीतील महाराष्ट्र कॅडरचे भारतीय पोलीस सेवा (आयपीएस) अधिकारी आहेत.

सिडको महामंडळात सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी श्री. एस. एस. पाटील जिल्हा परिषद, अहमदनगर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते तर श्री. कैलास शिंदे पालघर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होते. श्री. एस. एच. महावरकर सिडकोतील मुख्य दक्षता अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी नागपूर पोलिस आयुक्तालयामध्ये अपर पोलीस आयुक्त म्हणून कार्यरत होते.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, सिडको**